भावार्थ ज्ञानेश्वरी

(२१ व्या शतकासाठी)

सुलभ ओवीबद्ध रचना

अध्याय तेरावा , भाग पहिला



विजय बळवंत पांढरे B.E. (Civil)

ई-आवृत्ती

साहित्य प्रतिष्ठान®

भावार्थ ज्ञानेश्वरी(२१व्या शतकासाठी)

अध्याय तेरावा : भाग पहिला

मूळ लेखन : संत श्री ज्ञानेश्वर (इ.स. १२९१)

२१व्या शतकातील मराठीत ओवीबद्ध रुपांतर (इ.स. २०१०):

श्री विजय पांढरे

मु पो लाखनवाडा,

ता. खामगांव,

जि बुलढाणा. महाराष्ट्र.

9822992578

vbpandhare@gmail.com

ई प्रकाशन :

ई साहित्य प्रतिष्ठान®

9869674820

esahity@gmailcom

www.esahity.com

E Sahity Pratishthan

Eleventh floor(G1102)

Eternity

Eastern Express Highway

Thane, Maharashtra. 400604

मुखपृष्ठ रचना : श्री जावेद शेख

©श्री विजय पांढरे(२०१२)

या पुस्तकाची प्रिंट स्वरुपातील आवृत्ती मुकुंदराज महाराज संस्थान यांनी प्रकाशित केली असून ती ३९०/- रुपयांना उपलब्ध आहे.

प्रस्तुत ई आवृत्ती ही विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध असून कोणीही आपल्या वेबसाईट्वर डाऊनलोडसाठी विनामूल्य उपलब्ध करण्यास प्रकाशकांची कोणतीही हरकत नाही. या पुस्तकाची ई आवृत्ती प्रत्येक मराठी माणसाच्या डेस्कटॉपवर असावी हे आमचे ध्येय असून त्यासाठी **प्रत्येक मराठी माणसाचे सहकार्य अपेक्षित आहे.**

॥ ज्ञानेश्वरी ई पारायण अभियान ॥

जगातील सर्वोत्कृष्ट ग्रंथांपैकी श्री ज्ञानेश्वरी हा ग्रंथ आहे. त्यात परमार्थ तर आहेच. पण परमार्थाची खरी सुरूवात मनुष्य जन्म उत्कृष्टपणे जगण्यातून होते. कसे जगावे याचे उत्कृष्ट विवेचन सुंदर रितीने ज्ञानेश्वरीत केले आहे. प्रत्येक मराठी माणसाने वाचलेच पाहिजेत असे ग्रंथ म्हणजे छत्रपती शिवरायांचे चरित्र आणि श्री ज्ञानेश्वरी. पण ज्ञानेश्वरी प्रत्येक मराठी माणूस वाचतोच असे नाही. कारण १२९१ साली प्रचलित असलेल्या प्राकृतबहुल मराठीत लिहीलेली ज्ञानेश्वरी आजच्या तरुणांना समजायला कठीण जाते. अनेकजण प्रयत्न करतात पण नंतर सोडून देतात. कारण प्राकृत भाषा आजच्या तरूणाच्या ओळखीची राहिलेली नाही.

अशा वेळी ई साहित्य प्रतिष्ठान सादर करीत आहे २१व्या शतकातील सोप्या मराठीत ओवीबद्ध केलेली भावार्थ ज्ञानेश्वरी. श्री विजय पांढरे यांनी अत्यंत सोप्या भाषेत आणि २१व्या शतकातील तरुणांना समजेल अशा भाषेत ज्ञानेश्वरीचे केलेले रुपांतर आपल्याला आवडेलच. कारण मूळ ज्ञानेश्वरीतील गोडवा त्यांनी जसाचा तसा जपला आहे. रोज केवळ अर्धा तास, असे फ़क्त एकोणतीस दिवस वाचन करून आपण ज्ञानेश्वरीचे पूर्ण पारायण करू शकता. श्री विजय पांढरे लिखित २१व्या शतकासाठी सध्याच्या मराठीत ओवीबद्ध केलेली भावार्थ ज्ञानेश्वरीची भेट आम्ही आज ई साहित्य प्रतिष्ठानच्या व्यासपीठावरून सादर करीत आहोत. ही ज्ञानेश्वरी मूळ ज्ञानेश्वरीप्रमाणेच ओवीबद्ध असून समजायला खूपच सोपी झाली आहे. मूळ प्राकृत ज्ञानेश्वरीइतकीच रसाळ. या ज्ञानेश्वरी सोबत मूळ ज्ञानेश्वरीचीही ई प्रत विनामूल्य उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी व अभियानात सामिल होण्यासाठी खालील लिंक्सना भेट द्या.

www.esahity.com http://www.facebook.com/edyaneshwari
http://edyaneshwari.blogspot.in/ http://youtu.be/yCHZ85Xzuxc

॥ ॐ परमात्मने नमः ॥

अध्याय तेरावा

क्षेत्रक्षेत्रज्ञविभागयोग

करून श्रीगणेशाचे स्मरण । जे सकळ विद्यांचे अधिकरण । आता वंदू श्रीचरण । श्री गुरूचे ॥१॥
जयाचेनि प्रभावे । शब्दसृष्टीने फुलावे । आणि ज्ञान ते आघवे । जिव्हेसी ये ॥२॥
वक्तृत्व ते गोडपणे । अमृताते फिके म्हणे । आणि रसांनी दास होणे । अक्षरांचे मग ॥३॥
भावाचे होई अवतरण । दाविती ब्रह्ममयतेची खूण । प्रकटवून संपूर्ण । आत्मज्ञान ॥४॥
ते श्री गुरूचे पाय । हृदयी घेती ठाय । ते केवढे पुण्य होय । पूर्वजन्मीचे ॥५॥
ते नमस्कारुनी आता । जो पितामहाचा पिता । लक्ष्मीयेचा भर्ता । ऐसे म्हणे ॥६॥
पार्था लक्ष देऊनी ऐकीजे । देह हे क्षेत्र म्हणीजे । देहासी जाणे तो बोलीजे । क्षेत्रज्ञ येथे ॥७॥
तरी क्षेत्रज्ञ जो येथे । तो मीच जाण पुरते । जो सर्व क्षेत्राते । व्यापोनी असे ॥८॥
क्षेत्र आणि क्षेत्रज्ञाते । अंतरी जाणणे संपूर्ण ते । ज्ञान ऐसे तयाते । मानू आम्ही ॥९॥
अर्जुना या शरीरास । क्षेत्र असे नाव खास । तयाचा तो अभ्यास । करूया आता ॥१०॥
तया क्षेत्र का म्हणणे । घडे कैसे तयाचे उपजणे । कैसे ते बा वाढणे । पाहू आता ॥११॥
हे भ्रमाचे खेळणे । प्रकटते अज्ञाना कारणे । पाहू तयाचे जन्मणे मरणे । होई कैसे ॥१२॥
कैसा देह घेतो आकार । कैसा प्रकटतो तो साकार । जाणणे जन्ममृत्यूचा व्यापार । ज्ञान अर्जुना ॥१३॥
याच ज्ञानाकारणे । वेदांचे ते बडबडणे । साही शास्त्रे आणि पुराणे । याचसाठी ॥१४॥
बोलता ब्रह्ममयतेची बोली । साही दर्शने थकून गेली । पण अजून नाही विझली । चर्चा येथे ॥१५॥
सर्व शास्त्रांची उत्पत्ती । याच ब्रह्ममयतेसाठी । वेद आणि उपनिषदे ती । बोलती हेच ॥१६॥
या सर्व वादात । होत नाही एकमत । म्हणून सर्व पडले गोंधळात । येथे अर्जुना ॥१७॥
अज्ञानाचे कारणे । कोणा काहीच न कळणे । म्हणून आपल्याच कपाळाचे पिटणे । आढळे येथे ॥१८॥
नास्तिका द्यावया तोंड । वेद करताती बंड । आणि मग पाखंड । अजुनी वाढे ॥१९॥
ते वेदांना नाव ठेवती । तया कल्पित म्हणती । आणि पैज ते घेती । करण्या वाद ॥२०॥
सर्वच असती अज्ञानात । कोणालाच नाही काही कळत । म्हणून वादविवादात । भांडणे होती ॥२१॥
मृत्यू येतो शरीरास । चिंता पडली काही जणास । म्हणून योगी बनून हिमालयास । निघाले ते ॥२२॥
मृत्यूला घाबरले । म्हणून वनामाजी गेले । यमदमाचे ते केले । मेळावे पुरे ॥२३॥
हे सर्व ओळखून । राज्य त्यागलं शंकरानं । आणि स्मशानी जाऊन । वास केला ॥२४॥
संन्यास घेऊन ऐसा । शिवे पांघरल्या दाही दिशा । अहितकारी म्हणून कोळसा । वासनेचा केला ॥२५॥
शिरे चार ब्रह्मदेवास । पण काही न उमजले तयास । ऐसा प्रपंच हा खास । आहे अर्जुना ॥२६॥
देह असे हे स्थळ । जीवभाव तो मूळ । आणि प्राण हे कूळ । आहे येथे ॥२७॥
या प्राणाच्या घरी । भाऊ राबतात ते चारी । आणि मन असे कारभारी । येथे अर्जुना ॥२८॥
बैल इंद्रियरुपी राबतात । पहा त्या पंच विषयात । रात्रंदिवस ते खपतात । अखंडित येथे ॥२९॥
अज्ञानाचे कारणे । सुखाची इच्छा धरणे । तेच दुःखाचे पेरणे । आहे अर्जुना ॥३०॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

दु:खाचे पिक येता । नुरेच मग शांतता । मग काळजी आणि चिंता । पसरते येथे ॥३१॥
अथवा पाळून विधीविधाने । सुखाचे बीज पेरणे । मग सुखाचे पीक कापणे । घडे येथे ॥३२॥
काही म्हणती हे असे स्वभावे । यासी कर्माचे फळ म्हणावे । आम्हासी तुम्ही पुसावे । ज्ञान यांचे ॥३३॥
जीवभावाचे कारणे । घडे देहाचे ते प्रकटणे । आणि प्राणाच्या त्या कारणे । व्यापार याचा ॥३४॥
अनादि ती प्रकृति । सांख्य जियेते गाती । जीवभावाची निर्मिती । पंचभूता कारणे ॥३५॥
या पंचभुतांच्याच कारणे । घडे सृष्टीचे प्रकटणे । भवचक्राचे हे रहाटणे । त्यांचेच पायी ॥३६॥
जीवभावाच्या कारण । घडे तीन गुणांचे प्रकटन । मग सृष्टीचे अव्याहत चालणं । आपोआप ॥३७॥
रजाकारणे जन्मणे । सत्त्वाकारणे वाढणे । तमाकारणे मरणे । घडे येथे ॥३८॥
ऐसा सृष्टीचा खेळ । येथे चालतो सर्वकाळ । जीवभाव वढाळ । कारण त्यासी ॥३९॥
बोल हे ऐकून । म्हणाले काही जण । बा तुमचे हे ज्ञान । उथळ आहे ॥४०॥
अहो परब्रह्माचे ठिकाणी । कैसी प्रकृतीची कहाणी । हे क्षेत्र घ्या समजावूनी । आमचेकडून ॥४१॥
प्रथम येथे शून्यच होतं । शून्याशिवाय काहीच नव्हतं । संकल्प जागता या शून्यात । प्रकटलं ब्रह्म ॥४२॥
ब्रह्मभाव प्रकट होता । वाढली ती संकल्पता । संकल्प तो वाढता । प्रकटे सृष्टी ॥४३॥
ऐसी निर्गुणाची वाडी । जी होती त्रिभुवना एवढी । येथे अस्तित्वाची माडी । उदया आली ॥४४॥
पंचभुतांच्या ठिकाणी । प्रकटले विविध प्राणी । त्या पाचांचीच ही करणी । अवघी अर्जुना ॥४५॥
विविध त्या प्रमाणात । हे पाच मिसळती एकमेकांत । जीवसृष्टी मग अस्तित्वात । येते अर्जुना ॥४६॥
अकर्माचे कारण । जसे बांध घातले चोहीकडून । आणि नापीक ती जमीन । सुपीक केली ॥४७॥
जीवभावाच्या भ्रमाकारण । येथे घडे जन्ममरण । असं भवचक्राचं प्रकटन । झालं येथे ॥४८॥
मग अहंकारा दृढ करून । वाढवले येथे मीपण । जाती पहा चराचर वाहून । मीपणा कारणे ॥४९॥
ऐसे परब्रह्माचे ठिकाणी । होते संकल्पांची उभारणी । मग सृष्टी ती नटूनी । उभी राहे ॥५०॥
ऐसे मत ते ऐकून । पुढे आले अन्य जन । म्हणे तुमचे तारे तोडणं । पुरे आता ॥५१॥
परब्रह्माच्या गावी । संकल्पांची कल्पना करावी । मग का न मानावी । प्रकृति सांख्याची ॥५२॥
हे असे काहीच नाही । यांच्या न नादी लागावे तुम्ही । प्रश्न विचारतो आम्ही । उत्तरे द्या ॥५३॥
तरी आकाशी कवणे । केली मेघांची भरणे । अंतरिक्षी तारांगणे । धरी कवण ॥५४॥
गगनाच्या या मांडवा । कोणी वोढिला केधवा । वारा हिंडतू असावा । हे कवणाचे मत ॥५५॥
रोमा कवण पेरी । कोण समुद्र भरी । पर्जन्याच्या त्या सरी । प्रकटती कशा ॥५६॥
तैसे क्षेत्र हे स्वभावे । ही वृत्ती कवणाची नोहे । अहंकार जो वाहे । तया जन्म येथे ॥५७॥
मग आणखी एका जणानं । म्हटलं राग येऊन । एका काळानेच क्षेत्र भोगणं । नाही येथे ॥५८॥
येथे मृत्यूचाच वावर । मृत्यू सिंह सर्वांसी खाणार । मग आपल्या मताचा अहंकार ।कशाला धरावा ॥५९॥
येथे सर्वच मरणार । कोणीच नाही वाचणार । मग हा वादाचा व्यापार । कशासाठी ॥६०॥
महाकल्पाच्या अंती । नष्ट होऊनी अवचिती । तिन्ही लोक ते संपती । समूळ येथे ॥६१॥
लोकपाल नित्य नवे । दिग्गजांचे मेळावे । स्वर्ग नरक आघवे । संपुनी जाती ॥६२॥
शून्याच्या पसाऱ्यात । सर्व जण संपतात । मग अहंकारामाजी भ्रमत । रहावे कशाला ॥६३॥
पहा हा केवढा । पसरला मृत्यूचा जबडा । हत्ती तो त्रिभुवना एवढा । मरे येथे ॥६४॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

म्हणोनि येथे काळाची सत्ता । हे बोलणे खोटे आता । ऐसा घालती वाद पांडुसुता । या क्षेत्राविषयी ॥६५॥
चर्चा अशा अनेक । ऋषींनी केल्या कित्येक । पुराणे ती प्रत्येक । साक्षी याला ॥६६॥
वापरून अनुष्टुभादि छंद । ग्रंथ प्रतिपादती विविध । करती पहा वादविवाद । आपापसांत ॥६७॥
वेदातले बृहत्सामसूत्र । देखणेपणे पवित्र । परि तयाही हे क्षेत्र । समजले नाही ॥६८॥
आणखी अनेक जणांनी । अनेक त्या बुद्धिमंतांनी । नाना मतांची मांडणी । केली येथे ॥६९॥
या क्षेत्राची निर्मिती । न जाणे कोणाचीच मती । म्हणून हवालदिल असती । पहा सारे ॥७०॥
आता यावरी जैसे । जे क्षेत्र हे असे । आता तुज ते तैसे । सांगतो मी ॥७१॥
पंचमहाभूतांचे नाटक । निर्माण करी अहंकार एक । निर्मून इंद्रियांचे ते दशक । बुद्धि अव्यक्तासवे ॥७२॥
विषयांचे कारणे । सुखदु:ख प्रकटणे । आणि अहंकाराचे भासणे । घडे तेथे ॥७३॥
ऐसे क्षेत्रची व्याप्ती । सांगितली अर्जुना तुजप्रति । सृष्टीची ही निर्मिती । अशी होते ॥७४॥
आता ही महाभूते कवण । कैसी इंद्रिय होती निर्माण । हे सर्व विस्तारून । सांगतो तुजला ॥७५॥
वायू पृथ्वी आप तेज । आकाश तयांचे बीज । ही सांगितली समज । पाच भूते ॥७६॥
जसे जागृतीच्या अवस्थेत । स्वप्न असे लपत । वा त्या अमावास्येत । न दिसे चंद्र ॥७७॥
जसे त्या बालपणात । तारूण्य असे गुप्त । किंवा असे त्या कलिकेत । सुगंध जसा ॥७८॥
अर्जुना जसे लाकडात । अग्नी असतो वसत । तसे प्रकृतीच्या पोटात । अहंकार आहे ॥७९॥
होता अपथ्याचे कारण । वाढते शरीराचे तपमान । मग सर्व शरीर गरम होणं । घडे तेथे ॥८०॥
तैसे पंचभुतांचे कारणे । घडे अहंकाराचे प्रकटणे । मग जन्ममरणाचे दुखणे । विराजे येथे ॥८१॥
गोष्ट अहंकाराची मोठी । विशेष न लागे अज्ञानापाठी । सज्ञानाचे झोंबे कंठी । सदैव अर्जुना ॥८२॥
आता बुद्धि जी म्हणिजे । ती ऐशा चिन्हे जाणिजे । जे बोलले ते यदुराजे । ऐका तुम्ही ॥८३॥
इंद्रियांचे कारणे । वासनेचे प्रकटणे । विषयात मग लोळणे । घडे तेथे ॥८४॥
विषयात त्या लोळता । होते सुखदु:खाची प्राप्तता । मग तेथे ती द्वैतता । राज्य करी ॥८५॥
हे सुख हे दु:ख । हे पुण्य हे दोष । हे चूक हे चोख । मत त्यांचे ॥८६॥
वाईट आणि छान । थोर आणि लहान । अशी घेई जी पारखून । ती बुद्धि अर्जुना ॥८७॥
जी तेजतत्त्वात रहाते । आणि सत्त्वगुण वाढवते । आत्मतत्त्वास मग जोडते । जीवासंगे ॥८८॥
अर्जुना बा जाण । त्या बुद्धिस तू संपूर्ण । आता देतो समजावून । अव्यक्त अर्जुना ॥८९॥
सांख्यांच्या त्या सिद्धांतात । जिला प्रकृती म्हणतात । तिलाच नाव अव्यक्त । आहे अर्जुना ॥९०॥
सांख्यांच्या त्या मते । प्रकृती कशी असते । हे सांगितले मी तूते । सातव्यात अर्जुना ॥९१॥
सांख्य म्हणती जी जीवदशा । ते तिचेच नाव वीरेशा । येथे अव्यक्त ऐसा । पर्याय आहे ॥९२॥
जैसे रात्र ती सरता । नक्षत्रांचा संपतो राबता । तैसे मरण ते येता । लोपे देह ॥९३॥
देह गेल्या पाठी । इंद्रियादिक किरटी । कर्म उपाधि लपे पोटी । अव्यक्ताच्या ॥९४॥
जसे त्या बीजात । झाड लपलेलं असतं । वा वस्त्रपण जसे तंतूत । असे अर्जुना ॥९५॥
देह तो सांडता । पंचभूते पावती सूक्ष्मता । तीच बा अव्यक्तता । आहे अर्जुना ॥९६॥
अर्जुना तया नाव । अव्यक्त हे जाणावं । वर्णन आता तू ऐकावं । इंद्रियांचं पहा ॥९७॥
त्वचा जीभ घ्राण । कान आणि नयन । ही इंद्रिये पाच जाण । येथे अर्जुना ॥९८॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

या जीवभावाकारण । सुखदु:खाचं भासणं । बुद्धि करी मूल्यांकन । अनुभवाचे येथे ॥९९॥
वाचा आणि कर । चरण आणि अधोद्वार । जननेंद्रिय हे पाच प्रकार । कर्मेंद्रियांचे अर्जुना ॥१००॥
कर्मेंद्रिय जया म्हणतात । ती हीच पाच असतात । असे भगवान असे सांगत । अर्जुना येथे ॥१०१॥
प्राण जो अंतरी । तीच क्रियाशक्ती शरीरी । कर्मेंद्रियांची उभारी । तियेचे कारणे ॥१०२॥
ऐसी ही दहाही करणे । सांगितली देव म्हणे । ऐक आता एकाग्रतेने । मन अर्जुना ॥१०३॥
इंद्रिय बुद्धिमधील दुवा । जेथे रजोगुणाचा गवगवा । त्या रजोगुणाच्या गावा । मन म्हणती ॥१०४॥
आकाशी भास निळ्या रंगाचा । वा आभास तो मृगजळाचा । तसा खेळ मनाचा । खोटाच आहे ॥१०५॥
शुक्र रजाची होता मेळणी । घडते पंचभुतांची बांधणी । मग वायुतत्त्व दहा ठिकाणी । विभागले जाई ॥१०६॥
त्या दहा वायुकारणे । देहधर्म बळकट होणे । आपुलाली ती ठिकाणे । धरली त्यांनी ॥१०७॥
ते दहा जे असती । तेथे चंचलतेची वस्ती । अर्जुना रजोगुणाची शक्ती । चंचलते कारण ॥१०८॥
ती बुद्धिस हलवते । नि अहंकारा चाळवते । मग वासना ती वाढते । अंतरी अर्जुना ॥१०९॥
अर्जुना मनाची ही वळवळ । जी कल्पनाच केवळ । जीवाचा भास सकळ । मनाचे कारणे ॥११०॥
मन प्रवृत्तीचे कारण । मनाकारणे वासनेचं उभरणं । अहंकाराचे ते उत्थान । मनाठायी ॥१११॥
जे इच्छेला वाढवते । आशेला चढवते । भय चिंताचे भास ते । मनाचे कारणे ॥११२॥
द्वैताचे कारणे । अविद्येचे प्रकटणे । इंद्रिय विषयात फसणे । मनाचे कारण ॥११३॥
मनाच्याच कारण । जीवभावचे संचालन । निर्मिती आणि लय होणं । गुण मनाचा ॥११४॥
ऐसे भ्रांतीचे कोठार । आणि चंचल पहा अपार । विवेकाचे ते द्वार । झाकले तेणे ॥११५॥
अर्जुना जया म्हणती मन । तेच सर्व गोंधळाचं कारण । आता पंचविषयांचे ज्ञान । ऐकावे तू ॥११६॥
पहा स्पर्श आणि शब्द । रूप रस गंध । हे विषय पंचविध । ज्ञानेंद्रियांचे ॥११७॥
याच पाच दारानं । जाणिवेनं बाहेर धावणं । जसा हिरवा चारा पाहून । धावती पशु ॥११८॥
मग दाही इंद्रियांचे व्यापार । चालती येथे अपार । मग विचार सारासार । नुरे तेथे ॥११९॥
या इंद्रिय विषयाकारण । कर्मेंद्रियांनी कर्म करणं । या विषयांच्याच कारण । घडती क्रिया ॥१२०॥
ऐसे ते दाही । विषय या देही । आता सांगतो इच्छा तीही । ऐक जरा ॥१२१॥
मनी स्मरण ते येता । वा बोल कानावर पडता । प्रकटते जी संस्कारता । ती वृत्ती गा ॥१२२॥
इंद्रिय विषयांची भेट होता । प्रकटते वृत्ती तत्त्वत: । मग वासनेचा राबता । होई तेथे ॥१२३॥
वृत्ती उठल्याकारणे । मनाने स्वैर ते धावणे । मग नको ते करणे । घडे तेथे ॥१२४॥
जिला वृत्तीची आवडी । जिच्याकारणे बुद्धि होय वेडी । विषयांची जिला गोडी । ती इच्छा अर्जुना ॥१२५॥
मनी इच्छा प्रकटली । पण जर ती पूर्ण न झाली । मग वृत्ती जी विकारली । तिचे नाव द्वेष ॥१२६॥
आता काय असे सुख । ते लक्ष देऊनी ऐक । कामना समूळ होणे खाक । सुख अर्जुना ॥१२७॥
कामना त्या संपता । संपते ती अहंकारता । ऐसा मी-पणाचा राबता । मोडून जाये ॥१२८॥
मी-पण ते संपता । अंतरी प्रकटते शांतता । शांततेत स्वस्वरूपता । ठेवली आहे ॥१२९॥
मनी प्रकटता शांति । संपून जाती सर्व वृत्ती । आणि मग ती सुषुप्ति । अनुभवा येते ॥१३०॥
सुषुप्तीचा ओलांडता घाट । पडते आत्मतत्त्वाची गाठ । तीच सुखाशी भेट । आहे अर्जुना ॥१३१॥
ऐसी ही अवस्था । अंतरी न अनुभवता । जगणे तेच पार्था । दु:ख आहे ॥१३२॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

कामनांच्या कारणे । दु:खाचे ते भासणे । कामनांचे ते संपणे । सुख अर्जुना ॥१३३॥
अखंड असंग साक्षीभूत । देही चैतन्य जे राहतं । तयासीच बा म्हणतात । चेतना येथे ॥१३४॥
नखापासून केसापर्यंत । जे या शरीरी असे वसत । ते तिन्ही त्या अवस्थात । बदलेचना ॥१३५॥
मन बुद्धिचे व्यापार । चेतनेकारण पडती पार । सर्व सृष्टीचा हा व्यवहार । चेतनेकारण ॥१३६॥
जडात वा चेतनात । ती सारखीच असे वसत । तुला खोटे नाही सांगत । अर्जुना मी ॥१३७॥
त्या पौर्णिमेच्या चंद्राकारणे । सागरास भरती येणे । परि चंद्र न जाणे । ते अर्जुना ॥१३८॥
चुंबकाची लाभता सोबत । लोह असे ते हालत । जसे सूर्योदया सोबत । जाग येते ॥१३९॥
जसं त्या कासवीनं । फक्त पिल्लांकडे पहाणं । मग होतसे ते पोषण । तयांचे अर्जुना ॥१४०॥
अर्जुना तियापरी । आत्मतत्त्व इये शरीरी । सजीवपणाचा निर्माण करी । भास अर्जुना ॥१४१॥
तिलाच बा चेतना । म्हणतात पहा अर्जुना । आता धृतिच्या त्या वर्णना । ऐक तू ॥१४२॥
या सर्व पाच तत्त्वात । उघड वैर बा असत । पाणी नष्ट असे करत । पृथ्वीस अर्जुना ॥१४३॥
पाण्यास आटवी तेज । तेजासी वायुचि झुंज । आणि गगन पहा सहज । गिळे वायू ॥१४४॥
तैसे कोणत्याही वेळे । गगन सर्वांत बा मिसळे । पण मिसळून राही वेगळे । आकाश अर्जुना ॥१४५॥
ऐसी ही पाचही भूते । जी गिळती एकमेकाते । ती ऐक्य पावून देहाते । नांदती सुखाने ॥१४६॥
वैर ते सोडून । देही एकत्र नांदून । एकमेकांचे पोषण । करताती ते ॥१४७॥
असे हे मित्रत्वाने । धीर धरून एकत्र रहाणे । तया मी म्हणे । धृती अर्जुना ॥१४८॥
आणि जीव ते पांडवा । जो या छत्तिसाचा मेळावा । तो येथे जाणावा । संघात म्हणूनि ॥१४९॥
एवं छत्तीसही भेद । केले पहा तूज विशद । हेच अर्जुना प्रसिद्ध । क्षेत्र म्हणून ॥१५०॥
अनेक गोष्टींचा मेळावा । तया रथ म्हणती पांडवा । वा हातपायादि सर्व अवयवा । म्हणती देह ॥१५१॥
हत्ती घोडे जे युद्धाचे । सेना नाव तियेचे । आणि पुंज ते अक्षरांचे । वाक्य अर्जुना ॥१५२॥
गगनी ढगांचा तो मेळ । तया म्हणती बा आभाळ । मनुष्यलोका सकळ । जग म्हणती ॥१५३॥
जेव्हा तेल वात अग्नी । होती एकत्र बा तिन्ही । तयांची ती मेळणी । दीप अर्जुना ॥१५४॥
तैसे छत्तीस ही तत्त्वे । राहती जेथे एकत्वे । तेणे समूहपरत्वे । क्षेत्र म्हणीजे ॥१५५॥
कर्म अकर्माकारणे । येथे पाप-पुण्य पिकणे । म्हणून आम्ही कौतुकाने । क्षेत्र म्हणो ॥१५६॥
ऐकाचेनि मते । देह म्हणती ययाते । ऐसी नामे ती अनंते । यासी अर्जुना ॥१५७॥
परब्रह्मा नाही स्वत:चे भान । आणि देह भासे परी छिन्न । म्हणून देहा क्षेत्र म्हणणं । घडे अर्जुना ॥१५८॥
गुण कर्माच्या कारणे । विविध योनींचे प्रकटणे । ऐसे गुण कर्मसंयोगाने । प्रकटते क्षेत्र ॥१५९॥
हा त्रिगुणाचा विचार । पुढे चौदाव्यात येणार । आता ज्ञानाचा प्रकार । ऐक अर्जुना ॥१६०॥
क्षेत्र ते गुण विकार । सांगितले तुज सविस्तर । क्षेत्रातून मुक्तीचा विचार । ज्ञान आहे ॥१६१॥
ऐसे ते ज्ञान । योगी स्वत:च होती गगन । स्वर्गाचा मोह टाळून । मुक्त होती ॥१६२॥
सिद्धिची चाड न धरता । ऋद्धीच्या मागे न लागता । अष्टांगयोगाची कठीणता । ओलांडून जाती ॥१६३॥
तपाचे परिणाम जाणून । यज्ञांचे पुण्य त्यागून । सकळ कर्माना उल्लंघून । मुक्त होती ॥१६४॥
त्यासाठी काही करती भजन । काहींनी संन्यास तो घेणं । काही कुंडलिनीच्या मार्गानं । निघती अर्जुना ॥१६५॥
ऐसे या ज्ञानासाठी । साधक प्रयत्न करताती । वेदांचा ते अर्थ लावती । पानोपानी ॥१६६॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

गेल्याने सेवेच्या गावा । मोक्ष मिळेल पांडवा । या आशेने गुरुसेवा । करताती ते ॥१६७॥
ज्या ज्ञानाच्या कारण । अविद्याच जाई संपून । जीव आत्म्याचे एकपण । अनुभवा येते ॥१६८॥
त्या इंद्रियांना ओलांडून । प्रवृत्तीस पहा लाथाडून । जीवभावाचं संपणं । होतसे तेथे ॥१६९॥
द्वैताचं ते संपणं । आणि अद्वैत ते प्रकटनं । तयासीच म्हणतात ज्ञान । अर्जुना माझ्या ॥१७०॥
तेथे मी-पणाचा भास विरतो । जीवाचाच मोह संपतो । विश्वासी एकत्व पावतो । जीव तेव्हा ॥१७१॥
मग भवचक्र ते संपते । जेधवा कामना न उरते । ऐसे अनुभवणे ब्रह्म ते । मुक्ती अर्जुना ॥१७२॥
ऐसे ज्ञान ते होता । संपते मी-पणाची परिच्छिन्नता । विश्वासी अनुभवून एकता । मोक्ष घडे ॥१७३॥
ऐसे अनुभवता ज्ञान । प्रकटते मनी पवित्रपण । मग विटाळलेले मन । संपून जाई ॥१७४॥
आत्म्याच्या ठिकाणी जीवबुद्धी । लागली होती जी क्षयव्याधी । संपते मग ती उपाधी । ज्ञान होता ॥१७५॥
केवळ कानानी ऐकून । बुद्धिने समजावून घेऊन । डोळ्यांनी ते पहाणं । शक्य नाही ॥१७६॥
ज्ञान होता या शरीरी । ते आपला प्रभाव करी । मग इंद्रियांच्या व्यापारी । ते दिसे अर्जुना ॥१७७॥
प्रकटता वसंताची गाणी । होई फळाफुलांची लागणी । तैसे त्याच्या इंद्रियांच्या ठिकाणी । दिसे ज्ञान ॥१७८॥
जर खोल जमिनीत । मुळांना पाणी असे सापडत । असती मग पानेफुले बहरत । बाहेर अर्जुना ॥१७९॥
कोंभाचे टवटवीतपण । सांगे भूमिचे सुपीकपण । तैसे ज्ञान्याचे आचरणावरून । आकळे ज्ञान ॥१८०॥
आवडत्याचं घरी येणं । समजे आदरातिथ्यावरून । दर्शनात होणे समाधान । लक्षण साधूचे ॥१८१॥
जसे कापुराची जात । वास सर्वत्र असे दरवळत । बा प्रकाश असे बाहेर जात । काचेत कोंडता ॥१८२॥
तैसे अंतरात होता ज्ञान । देहावर प्रकटतात जी चिन्ह । देऊन ते अवधान । ऐकावे अर्जुना ॥१८३॥
कोणत्याही विषयास । तादात्म्य नसे तयास । दिखाऊपणाची आस । नाही तेथे ॥१८४॥
तयाचे वर्णिता गुण । वा होता तो बहुमान । तो जातसे संकोचून । मनी अर्जुना ॥१८५॥
तो जात असे घाबरून । जसे पारध्याने पकडता हरिण । जसा भोवऱ्यात गेला सापडून । पोहू जाता ॥१८६॥
तया असे बा वाटत । मानसन्मान ते संकट । नसे मोठेपणा तो घेत । कधी अर्जुना ॥१८७॥
पूज्यता डोळा न देखावी । स्वकीर्ती कानी न ऐकावी । तयाने लोकां न दाखवावी । योग्यता कधी ॥१८८॥
सत्कार तो घेणे । स्वत:स सर्वत्र मिरवणे । तयाच्या पाया पडणे । नावडे तया ॥१८९॥
आत्मज्ञानाच्या कारणे । तयाचे सर्वज्ञच असणे । परि राहे तो वेडेपणे । समाजामाजी ॥१९०॥
आपले ते चतुरपण । तयाने झाकून ते ठेवणं । आणि मिरवे तो पिसेपण । आवडीने ॥१९१॥
उद्वेग त्याला लौकिकाचा । आणि उबग वाटे शास्त्रांचा । मार्ग तो मौनाचा । आवडे तया ॥१९२॥
जगाने अवज्ञा करावी । कुणाचीही संगत न धरावी । ऐसी तयाच्या जीवी । आवड बहू ॥१९३॥
नम्रपणानं रहाणं । कमीपणा स्वीकारून । असेच तयाचं वागणं । सर्वत्र अर्जुना ॥१९४॥
हा जिवंत की मेला । शंका यावी जगाला । असेच वाटे तयाला । म्हणून वागे तैसा ॥१९५॥
स्वेच्छेने हा चालतो । की वाऱ्यासवे वाहतो । ऐसा संशय पहा तो । येतसे जगा ॥१९६॥
संपो माझे ते जीवपण । विरो नामरुपाचं असणं । व्यर्थ शरीर धारण । वाटे तयासी ॥१९७॥
ऐसा जयाचा नवस । आवडे सदैव एकांतवास । जाणे बा वनास । आवडे तयाला ॥१९८॥
गर्दीचे तया वावडे । गगना बोलणे आवडे । वनस्पती प्राणी आणि झाडे । आवडती तया ॥१९९॥
किंबहुना ऐसी । चिन्हे जयात देखसी । जाण तया ज्ञानासी । गाठ पडली ॥२००॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

अमानित्व हा गुण । आपण घेतला समजावून । आता अदंभासी जाण । अर्जुना तू ॥२०१॥
तरी अदंभित्व ऐसे । लोभ्याचे ते मन जैसे । जीव गेला तरी न सांगतसे । जागा धनाची ॥२०२॥
तैसे बा अर्जुना । आपुला जीव का जावोना । परि तो प्रकट करेना । पुण्य आपले ॥२०३॥
खोड्याळ गाय पान्हा । चोरते जशी अर्जुना । नाही का ती वारांगना । लपवते वय ॥२०४॥
वनी चुकता धनवानाने । आपली श्रीमंती लपवणे । वा झाकणे कुलीन स्त्रीने । अवयवा जैसे ॥२०५॥
जसे त्या शेतकऱ्याने । बीज मातीने झाकणे । तैसे पुण्यकर्म न सांगणे । याने कधी ॥२०६॥
नावडे तया देहाचे पूजन । न करी लोकांचे रंजन । सत्याचा प्रचार करणं । नावडे तया ॥२०७॥
परोपकार न बोले । न मिरवी अभ्यासिले । पुण्य कधी न विकले । प्रतिष्ठेसाठी ॥२०८॥
विषयांच्या त्या भोगात । तो खर्च नसे करत । पण धर्माच्या बाबतीत । उदार बहू ॥२०९॥
दारिद्र्य तयाच्या घरात । देहाचीही झाली वाताहत । पण मागे टाकी तो दानात । कल्पवृक्षा ॥२१०॥
आत्मज्ञानी स्थिर । अध्यात्म उपदेशात उदार । आत्मचर्चेत तो चतुर । एऱ्हवी वेडा ॥२११॥
जसे केळीचे ते झाड । पोकळच वाटते खोड । पण फळे रसाळ गोड । गोमटी तिथे ॥२१२॥
जसे मेघ ते आकाशात । हलकेच ते वाटतात । पण वर्षा ते करतात । भारी अर्जुना ॥२१३॥
ऐसा तो आत्मज्ञानात । असे अति पारंगत । पण इतर त्याबाबतीत । नाही कोठे ॥२१४॥
ऐशा या चिन्हांना । जेथे देखशील तू अर्जुना । समज तेथे ज्ञाना । एकी झाली ॥२१५॥
जया म्हणती अदंभपण । ते झाले पहा सांगून । आता ऐक ती खूण । अहिंसेची ॥२१६॥
अहिंसेच्या बाबतीत । बहुत असती मत । तयांची ती गंमत । ऐक आता ॥२१७॥
फांद्या त्या तोडून । करावे झाडाचे संरक्षण । असेच तयांचे ज्ञान । अहिंसेविषयी ॥२१८॥
जसं करण्या भूक निवारण । हात तोडून विकणं । वा मंदिर पाडून बांधणं । कुंपण अर्जुना ॥२१९॥
करण्या ती अहिंसा । करावी बा हिंसा । ऐसी ती पूर्वमीमांसा । सांगोन गेली ॥२२०॥
अवृष्टीच्या कारण । विश्वानं तळमळणं । म्हणून यज्ञ ते करणं । पर्जन्यासाठी ॥२२१॥
असे इच्छेच्या कारण । पशुहिंसा करणं । मग अहिंसा ती असणं । नाही तेथे ॥२२२॥
प्राप्त होण्या अहिंसेस । अंगीकारणे त्या हिंसेस । पहा कैसे हे धाडस । या याज्ञिकांचे ॥२२३॥
आणि आयुर्वेदही आघवा । ऐसाच बा पांडवा । घात जीवाचा करावा । जीवासाठी ॥२२४॥
नाना रोगांच्या कारण । माणसाचं आजारी पडणं । मग विविध उपाय योजून । करती चिकित्सा ॥२२५॥
करण्या चिकित्सा ती । झाडांचे कंद खणती । आणि वनस्पती समूळ उपटती । पाल्यासाठी ॥२२६॥
काहींचा गाभा काढती । काहींची साल सोलती । काहींना ते उकडती । क्षारासवे ॥२२७॥
अजातशत्रू तरूवरा । सर्वांगा देऊनि चिरा । ऐसे जीव घेऊनि धनुर्धरा । काढती चीक ॥२२८॥
सजीव प्राण्या पकडतात । नि पित्त ते काढतात । असे दुःख ते देतात । सजीवांनाही ॥२२९॥
जसे तोडून वस्ती घरे । बांधावीत देऊळ देव्हारे । वा लोका लुबाडून व्यवहारे । दानधर्म ॥२३०॥
पाय ते उघडे पाडून । मस्तका घेणे पांघरुण । वा घरापुढे मांडव उभारणं । मोडून घर ॥२३१॥
जसं पांघरुणे जाळून । पाणी ते तापवणं । ते तर हत्तीने अंग धुणं । तसं अर्जुना ॥२३२॥
(हत्ती अंघोळ केल्यावर अंगावर सोंडेने पुन्हा माती उडवून जास्त घाण करतो)
विकून बैल गोठा बांधणं । पोपट देऊन पिंजरा घेणं । तशी ही सर्व कृती जाण । अर्जुना तू ॥२३३॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

अहिंसेच्या कारण । पाणी गाळून पिणं । मग जीवजंतूचं मरण । होई तेथे ॥२३४॥
हिंसेला त्या भिऊन । काही न शिजवती अन्न । मग तडफडणे अन्नावाचून । हिंसा मोठी ॥२३५॥
हिंसेस म्हणणे अहिंसा । कर्मकांड्यांचा सिद्धान्त ऐसा । घेता अज्ञानाचा वसा । ज्ञान कैसे ॥२३६॥
अहिंसेचे नाव घेता । आम्हा स्फूर्ती चढली तत्त्वत: । म्हणून या सिद्धांन्ता । सांगणे झाले ॥२३७॥
अंतरी जे यावे । ते का न मी बोलावे । तुला सर्वकाही समजावे । भाव ऐसा ॥२३८॥
त्या अज्ञानाकारणे । ऐसे तयांचे वागणे । उगाच न घडे ते जाणे । आडवाटेने अर्जुना ॥२३९॥
स्वत:च्या मतासोबत । इतरांची मते जी असतात । ती ही घेणे बा ध्यानात । योग्य अर्जुना ॥२४०॥
करताना ते निरूपण । इतरांचाही विचार करणं । ते घडेच बा योगायोगानं । अर्जुना माझ्या ॥२४१॥
आता माझे मत सांगेन । अहिंसेचे वर्णन करीन । बा अहिंसा आणि ज्ञान । भिन्न नाही ॥२४२॥
जे सत्यज्ञान असते । ते आचरणात उतरते । हीच कसोटी असते । ज्ञानाची अर्जुना ॥२४३॥
ज्ञान मनी होता । प्रकटते जी अहिंसकता । त्या अहिंसेस आता । ऐकशील तू ॥२४४॥
तरंगा धक्का न लावता । लाटा त्या न फोडता । आणि स्थिरता न मोडता । पाण्याची अर्जुना ॥२४५॥
भक्ष्यावर लक्ष ठेवून । हळुवारपणे चालणं । जसे त्या बगळ्यानं । पाण्यात अर्जुना ॥२४६॥
जसं त्या भ्रमरानं । कमळावर हळुवारपणे चालणं । दुखवणे ते परागकण । न आवडे तया ॥२४७॥
भूमीचे ते कण । तयाना सजीव बा मानून । हळुवारपणे ते चालणं । घडे त्याचे ॥२४८॥
सर्वांवर कृपा बरसत । चौ दिशा स्नेहाने भरत । जीवातळी असे अंथरीत । जीव आपुला ॥२४९॥
असे अत्यंत जपून । अर्जुना तयाचं चालणं । तयाचे ते वर्णन । शब्दातीत ॥२५०॥
जसे त्या मांजरीने । पिल्ला दातात धरणे । तेथे पिल्लासी दात टोचणे । न घडे जैसे ॥२५१॥
जसे स्नेहाळूपणे । तान्हुल्याची वाट पहाणे । अर्जुना त्या आईने । काळजीने जैसे ॥२५२॥
हलविता कमळ फुलास । जितका वारा लागे बुब्बुळास । तैसी तयाच्या हळुवारपणास । नाही सीमा ॥२५३॥
ऐसे हळुवारपणे । तयाचे भूमीवर चालणे । मग सुखाचे ते प्रकटणे । होई तेथे ॥२५४॥
ऐसे जपून ते चालता । भूमीवर कृमीकीटक दिसता । तेथे पाय न ठेवता । तो फिरे मागे ॥२५५॥
म्हणे पाय तो पडता । त्रास जीवा होता । जिवाची ती स्थिरता । न भंगो कधी ॥२५६॥
ऐसे दयेचे कारणे । तयाचे मागुती फिरणे । तेथे कीटकांना तुडवणे । न होई कधी ॥२५७॥
सजीव ते समजून । गवताही न तुडवणं । मग कीटकांना दुर्लक्षून । तो जाई कैसा ॥२५८॥
मुंगीने मेरू न ओलांडणे । चिलटाने सागर न तरणे । तैसे जीवा त्रास देणे । न ठाऊक तया ॥२५९॥
ऐसे प्रत्यक्ष आचरणात । तेथे प्रेम असे दिसत । दया ती असे नांदत । कृतीत त्याच्या ॥२६०॥
श्वसन त्याचे सुकुमार । मुख प्रेमाचे माहेर । माधुर्याचे ते अंकुर । दात तैसे ॥२६१॥
आधी स्नेह तो पाझरे । पुढे चालती ती अक्षरे । शब्द पाठी अवतरे । कृपा आधी ॥२६२॥
आधी तो बोलतच नाही । बोलला जरी तो काही । तयाचे बोल कोणाही । खुपतील कैसे ॥२६३॥
तयाने अधिक जरी बोलणे । ते वर्मी नच लागणे । कोणासही ते दुखावणे । नावडे तया ॥२६४॥
शांती कुणाची का भंगेल । भिऊन का कुणी उडेल । ऐकून का कुणी दचकेल । आवाज माझा ॥२६५॥
कुणाही पीडा न होवो । कुणाचीही भुवई वर न जावो । मनी ऐसा भावो । तयाच्या अर्जुना ॥२६६॥
जर कदाचित कोणी । प्रार्थिले उपदेशावे म्हणूनि । मग तो मायबापावानी । उपदेश करी ॥२६७॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

जैसे नादब्रह्म आकारा आले । की गंगोदक ओसंडले । तैसे तो जे बोले । ते पवित्र अर्जुना ॥२६८॥
तैसे सत्य आणि मवाळ । थोडकेच पण सरळ । बोल जैसे कल्लोळ । अमृताचे ॥२६९॥
विरोध वाद करणे । कुणाही त्रास ते देणे । उपहासून ते बोलणे । न ठाऊक तया ॥२७०॥
दुराग्रह कपट भांडण । आशा शंका प्रतारण । हे सोडले बा अवगुण । वाचेने तयाच्या ॥२७१॥
ऐसी दृष्टी तयाची । अविरत वृष्टी स्नेहाची । वृत्ती ती संतापाची । संपली तेथे ॥२७२॥
आहे सर्वत्र ब्रह्ममयता । पाहता खुपण्याची शक्यता । म्हणून पाहणेही सर्वथा । टाळतसे तो ॥२७३॥
जेधवा दृष्टी असे टाकत । तेव्हा कृपाच असे बरसत । तयाच्या त्या पहाण्यात । अमृत अर्जुना ॥२७४॥
चंद्राबिंबातून जे असे बरसत । अमृत डोळया नसे दिसत । परि पुष्ट होतात । चकोर अर्जुना ॥२७५॥
तयांने पाहता प्राण्यांना । शांती अनुभवा येई मना । तयाच्या पहाण्याची तुलना । कासवा नाही ॥२७६॥
किंबहुना ऐसी । दिठी जयाची भुतासी । तयाचे कर ते देखसी । तैसेच ते ॥२७७॥
पावूनि पूर्ण समाधान । जसे ज्ञान्यांचे ते मन । तैसे तयाच्या देहानं । बसावे स्थिर ॥२७८॥
आंधळ्याने पाहणे सोडणं । इंधन संपल्याने अग्नी विझणं । जैसे मुक्याचे मौन । तयाचे अर्जुना ॥२७९॥
तैसे तयाच्या हाताना । नसे कर्तव्य अर्जुना । म्हणुनि अकर्त्याच्या ठिकाणा । बैसो येती ॥२८०॥
वाऱ्यासी जखम होते । का आकाशा नख टोचते । म्हणून तयाचे कर ते । स्थिर राहती ॥२८१॥
माशी ती उडवावी । चिलटे दूर झाडावी । पशुपक्ष्या दावावी । त्रास मुद्रा ॥२८२॥
तेथे नाहीच या गोष्टी । तया न आवडे दंड काठी । मग शस्त्रांचे किरटी । स्थान कोठे ॥२८३॥
फुले तोडून गुंफणे । पुष्पमाला त्या करणे । फुलांना त्रास देणे । नावडे तया ॥२८४॥
हात तो न चोळी । न अंग तो कुरवाळी । नखाची ती गुंडाळी । बोटावरी ॥२८५॥
कर्म काही करणे । हातासी ठाऊक नसणे । परि घडे बा नमस्कारणे । भेटता कोणी ॥२८६॥
सर्वांसी देणं अभयदान । गरजवंता मदत करणं । दु:खिताना स्पर्श करून । घालवी दु:ख ॥२८७॥
रागावूनही स्पर्शता । संपते ती दु:खता । कोणाही न लागे पत्ता । जिव्हाळा ऐसा ॥२८८॥
तयाच्या स्पर्शाने । सुख अनुभवा येणे । पशुसही आनंद होणे । कुरवाळता ॥२८९॥
तयाचे जे हात । जशी चंदनाची रीत । जे असूनही फल रहित । आनंद देती ॥२९०॥
बोलणे नको फार । जाण तयाचे ते कर । सज्जनांचे परोपकार । अपार जैसे ॥२९१॥
ऐसे तयाचे मन । ऐकलेस जे तू वर्णन । तयाचेच गुणगान । केले मी ॥२९२॥
शाखा आणि तरू । जल आणि सागरू । प्रभा आणि प्रभाकरू । भिन्न नाही ॥२९३॥
अवयव आणि शरीर । वेगळे नसती फार । रस आणि नीर । एक जैसे ॥२९४॥
हे सर्व जे वर्णन । अर्जुना केले मी कथन । तयालाच बा मन । म्हणती अर्जुना ॥२९५॥
बीज भूमीत पेरणं । तयाचाच वृक्ष होणं । तैसेच मनाचे प्रकटन । शरीर अर्जुना ॥२९६॥
जे मनात असते । तेच बाहेर प्रकटते । म्हणून अहिंसाच असते । वर्तनी त्याच्या ॥२९७॥
अंतरी जे असते । तेच बाहेर बा प्रकटते । मग मनइंद्रियांचे व्यवहार ते । तैसेच होती ॥२९८॥
जे मनातच नाही । अर्जुना ते प्रकटत नाही । बीजेवीण का भुई । अंकुर फुटे ॥२९९॥
जे उगमातच वाळून गेलं । ते प्रवाहित कसं होईल । जीव जाता हालचाल । होत नाही ॥३००॥
मोडता मनाचे मनपण । संपे इंद्रियाचे चंचलपण । कळसुत्री बाहुली सूत्रधारावीण । नाचते का कधी ॥३०१॥

For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

॥जेथे जेथे मराठी माणूस, तेथे तेथे ज्ञानेश्वरी॥

सर्वत्र वेद यज्ञाचा घाट।अन् सुविद्येचा झडझडाट । वारा सत्वगुणाचा सोसाट। वाहू लागे॥

अशी सुसाट सुगंधी वार्‌यासारखी ज्ञानेश्वरी सर्वत्र पसरवावी. जगातील प्रत्येक मराठी माणसाने त्याचा आनंद घ्यावा व अवघे जन सुखी व्हावे अशी ज्वलंत आणि तीव्र ईच्छाशक्ती असणार्‌या सर्व वयाच्या वाचकांनी आमच्याशी संपर्क साधावा. आपण जर अजून एकापर्यंत ही ज्ञानेश्वरी पोहोचवू शकत असलात तरी ते एक महत्त्वाचे काम होईल. सहस्त्र बाहू, लक्ष मने या कार्यात लागले तर हा गोवर्धन सहज उचलू शकतील. आपल्या संपर्कात काही प्रसार माध्यम असेल तर हे काम अधिकच सोपे होईल. आपल्या हाती जे असेल ते साधन वापरून आपण या ज्ञानियांच्या राजाच्या ज्ञानानुभवाचा प्रसार करूया.

ज्ञानेश्वर माऊलींचा संदेश सर्व जगात सुगंधासारखा पसरो आणि सर्व जीव सुखी होवोत अशी प्रार्थना करून या कामाला सुरूवात करूया.

सामिल होण्यासाठी लिहा : esahity@gmail.com

संपूर्ण ज्ञानेश्वरीसाठी भेट द्या : www.esahity.com

Facebook वर पहा : http://www.facebook.com/edyaneshwari

ब्लॉगला भेट द्या : http://edyaneshwari.blogspot.in/

या शिवाय या ज्ञानेश्वरीचे तीस तासांचे सांगीतिक पारायण उपलब्ध असून कोणाला FM Radio किंवा तत्सम प्रसार माध्यमासाठी हवे असल्यास संपर्क साधावा. हे सांगितिक ई पारायण लवकरच स्वरनेटाक्षरी या ई साहित्य प्रतिष्ठानच्या ऑडिओ वेबसाईटवर उपलब्ध होईल.

ई मेल द्वारे दर गुरूवारी एक एक भाग ई साहित्य प्रतिष्ठानच्या सव्वा लाख वाचकांना उपलब्ध केला जाणार आहेच. त्यांच्या मार्फ़त ही ज्ञानेश्वरी किमान बारा लाख मराठी माणसांपर्यंत जाणार हे तर निश्चितच.

जगातील बारा कोटी मराठी मनांपर्यंत ती पोहोचावी ! या ज्ञानयज्ञात आपण सहभागी व्हाल ना!

अध्यात्म विषयाचे सखोल मनन, चिंतन व मंथन करून वेशाने साधू नसलेले, पण वृत्तीने साधू असलेले ज्यांच्यावर मी खूप खूप प्रेम करतो, असे श्री विजयजी पांढरे. विजयजी यांनी 'समग्र ज्ञानेश्वर' अगदी सरळ मराठी भाषेत यावेत यासाठी दिनरजनी अथक प्रयास केला आहे. प्रथम त्यांनी 'अमृतानुभव' अगदी सोप्या व सरळ मराठीत ओवीबद्ध केला, नंतर 'चांगदेव पासष्टी' त्याचबरोबर आता श्री ज्ञानेश्वरीसारखा विशाल व ९०३४ ओव्यांनी ओतप्रोत असलेल्या ग्रंथाला ओवीबध्द करुन पूर्ण केले आहे.

श्री. विजयजी यांच्या या पवित्र कार्याचा व विचाराचा भाविकांनी, ज्ञानेश्वरीवर प्रेम करणाऱ्या वारकऱ्यांनी, अभ्यासूंनी खूप आदर करावा. सर्वांना समजेल, सहज कळेल अशी सोपी भाषा त्यांनी ज्ञानेश्वरीवर प्रतिज्ञानेश्वरी रचतांना वापरली आहे. या मागील त्यांचा पवित्र उद्देश हाच आहे, की संत ज्ञानेश्वर महाराजांची ज्ञानेश्वरी सर्व लोकांना कळावी. म्हणून पारंपारिक संकोचित वृत्तीचा परित्याग करून व्यापक विचाराच्या दृष्टीतून या सोप्या भाषेतील ज्ञानेश्वरीकडे सर्व भाविकांनी व वारकरी संप्रदायातील सर्व संतांनी पाहावे अशी मी आशा करतो. विशेष म्हणजे वारकऱ्यासारखा न दिसणारा परंतु हृदयातून पूर्ण वारकरीच असणारा हा तत्त्वचिंतक मी अतिशय जवळून अनुभवलेला आहे. म्हणून त्यांच्या विचाराचा व या आध्यात्मिक कार्याचा खूप आदर करतो . त्यांच्या या कार्याला माझे अनंतानंत शुभ आशीर्वाद. पुन्हा त्यांच्या हातून अशीच वाङ्मयीन सेवा घडत राहो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

परमहितैषी आचार्य स्वामी हरिचैतन्य
गुरुदेव आश्रम, पळसखेड (स.), बुलढाणा

आजच्या मराठी भाषेत ओवीबद्ध झालेली अशी ही ओवीरचना भावार्थ ज्ञानेश्वरीच्या रूपाने प्रकटली आहे ती ईश्वरी कृपाच होय. मनुष्याची बुद्धी हे काम नक्कीच करू शकत नाही. हा भावार्थ वाचताना मनाची पकड तर घेतोच पण वाचता वाचता गोडी अधिकच वाढत जाते व मनाचा वेगळ्या विश्वात प्रवेश होतो. आत्मज्ञानासंबंधीचे सविस्तर निरूपण पुन्हा एकदा सुलभ स्वरूपात जनसामान्यांच्या भाषेत ज्ञानेश्वरीची मूळ गोडी घेऊन प्रकटले आहे.

ह.भ.प.संजय महाराज पाचपोर
गुप्तेश्वर संस्थान, मु.पो.शिर्ला, ता.खामगांव जि.बुलढाणा

'चांगदेव पासष्टी' व 'अमृतानुभव' आणि 'भावार्थ गीता' या दोन ग्रंथांनंतर आता 'भावार्थ ज्ञानेश्वरी' हा ओवीबद्ध ग्रंथ घेऊन श्री.विजय बळवंत पांढरे वाचकांच्या भेटीला येत आहेत. इथे वाचकांच्या भेटीला हा शब्द मी वापरला पण श्री.विजय बळवंत पांढरे यांच्या या लेखनाचा वाचक हा `टाइमपास` करण्यासाठी छापील माकुरावरून नजर फिरवणारा वाचक नव्हे ! याच्या चित्ताला आध्यात्मिक तळमळीचा, ओझरता का होईना स्पर्श झालेला आहे असा हा वाचक आहे. साधनेच्या मार्गावर पाऊल टाकू इच्छिणारा किंवा ज्याने पाऊल टाकले आहे असा हा वाचक आहे. असा वाचक जेव्हा भगवद्गीता, चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, ज्ञानेश्वरी या ग्रंथांवरील लेखन वाचतो तेव्हा त्याचे वाचन ही त्याच्या आंतरिक साधनेची वाटचाल असते. श्री.विजय बळवंत पांढरे ज्ञानेश्वरीचे साधक, अभ्यासक आहेत; पंडित अभ्यासक नव्हेत. त्यामुळे त्यांच्या ज्ञानेश्वरीच्या अभ्यासाला साधनेचा सुगंध आहे. सर्वसामान्य माणसापर्यंत सुलभीकरणाच्या मार्गाने ज्ञानेश्वरी पोचवण्याचा श्री.विजय बळवंत पांढरे यांचा हा प्रयत्न त्यांच्या हेतूची पूर्तता करणाच्या दृष्टीने यशस्वी ठरेल असा मला विश्वास वाटतो.

कविवर्य मंगेश पांडगावकर,
साईप्रसाद, सायन(प), मुंबई

ज्ञानेश्वरी ही मराठी भाषेत असली, तरी आमच्या मराठी भाषिकाला ती समजणे अवघड जाते हे खरे. कारण ज्ञानेश्वरीत यादवकाळात प्रचलित असलेले शब्द व विधानांची वळणे आहेत. विजय पांढरे यांनी ज्ञानेश्वरीचे हृदगत नीट सांभाळून प्रचलित मराठीत आणले आहे व ते बरेच सुबोध झाले आहे. भाषा-भाषांमधील प्रवास चांगल्या वाटाड्याच्या सहाय्याने अर्थाला निर्वेधपणे करता येतो.

श्री. पांढरे यांचे निर्वाहाचे क्षेत्र वेगळे आहे, तरी ज्ञानेश्वरांनी त्यांना वेड लावले. त्यामुळे रूपांतराच्या निमित्ताने एका लोकोत्तर साक्षात्कारी संतांच्या योगयुक्त वाणीच्या मनोमय सान्निध्यात त्यांना काही काळ घालवता आला. त्यामुळे उरलेल्या आयुष्याची पाऊलवाट सोन्याची झाल्याची कृतकृत्यता त्यांना मिळेल. संतांचा एवढा प्रसादही पूर्वसंचितामुळेच लाभू शकतो, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन.

मा. राम शेवाळकर, नागपूर

esahity@gmail.com
ई-साहित्य प्रतिष्ठान®
www.esahity.com

श्री विजय पांढरे यांची ओळख

श्री विजय बळवंत पांढरे (BE Civil) हे मुख्य अभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, (M.E.R.I.), नाशिक येथे अधीक्षक अभियंता व सहसंचालक या पदावर कार्यरत असून त्यांनी चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, भगवद्गीता व ज्ञानेश्वरी या चारही ग्रंथांचे आधुनिक प्रचलीत मराठीत सुलभ असे ओवीबद्ध रुपांतर केले अनुवाद केले आहेत. सदर ओवीबद्ध ग्रंथ ऑडिओ स्वरुपात व छापील स्वरूपातही उपलब्ध आहेत. त्यांनी नुकतीच अष्टावक्रगीताही आजच्या मराठीत ओवीबद्ध केली आहे. अध्यात्म हा चित्तस्थिरीकरणाचा , चित्तशुद्धीचा व चित्तलयाचा विषय असल्याचे या सर्व ग्रंथातून त्यांनी स्पष्टपणे मांडले आहे. सर्व धर्म, सर्व मार्ग, सर्व साधना, सर्व गुरू, सर्व ग्रंथ या सगळ्यांचे सार तेच आहे. सर्वांनी असा शास्त्रीय दृष्टीकोन बाळगल्यास आत्मज्ञान दूर नाही असे ते स्वानुभवावर सांगतात. (दूरभाष : ९८२२९९२५७८)

ई साहित्य प्रतिष्ठान

२००८ पासून मराठी ई पुस्तकांच्या निर्मितीत आणि वितरणात महत्त्वाचा वाटा ई साहित्य प्रतिष्ठानने उचलला आहे. आजवर २०० हून अधिक ई पुस्तकांची निर्मिती करणाऱ्या ई साहित्य प्रतिष्ठानचे आजघडीला सव्वा लाख वाचक आहेत. या सर्व वाचकांपर्यंत ही ई पुस्तके विनामूल्य वितरित केली जातात.

विनामूल्य ई पुस्तकांसाठी मेल पाठवा : esahity@gmail.com

अधिक माहिती साठी भेट द्या : www.esahity.com

फ़ोन : ९८६९६७४८२०